# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०१/२०२५ (सोमवार) सकाळ**

---

### अनैतिक देहव्यापार करण्यास प्रवृत्त करणारे आरोपी गजाआड
### पोस्टे पारशिवनी यांची कारवाई

पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत मौजा ईटगाव फाटा काकडे रेस्टॉरेंट बार व लॉजिंग ता पारशिवनी येथे दिनांक ११/०१/२०२५ चे २०/०५ वा. ते २२/१० वा. दरम्यान पोस्टे पारशिवनी येथील पोलीस स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, यातील **आरोपी १) रूपेश चिंतामन कोहळे वय ४० वर्ष, रा. जय भोले नगर चनकापुर** हा चालवित असलेला **आरोपी २) रामु काकडे, रा. इटगाव** याचे सांगणेवरून त्याचे मालकीचे मौजा ईटगाव फाटयावरील काकडे रेस्टॉरेंट बार लॉजींग येथे **आरोपी ३) कार्तिक अशोक धोपटे वय २३ वर्ष, रा. डोंगरी ता रामटेक** याचे मदतीने गुन्हयात आरोपीतांकडुन सुटका केलेल्या मुलीस अधिक पैश्याचे आमिष दाखवुन तिला देह व्यापार करण्यासाठी प्रवृत्त करून तिचे मुळ गावी चंद्रपुर येथुन बोलावुन घेवुन ग्राहकांना लॉज मध्ये जागा उपलब्ध करून देवुन पिडीत मुलीस ग्राहकांना पुरवुन कुंटणखाना चालविताना मिळुन आल्याने पोलीस स्टाफसह रेड कारवाई करून आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले.

सदर प्रकरणी पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३, ४, ५ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कायदा सहकलम १४३(२), ३(५), ४९ भान्यासं कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. १) व ३) यांना अटक करण्यात आली आहे.

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
### पोस्टे भिवापुर यांची कारवाई

दिनांक १३/०१/२०२५ रोजी पोस्टे भिवापुर येथील स्टाफ अवैध धंदेकामी पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, उखळी शिवार येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून नमुद घटनास्थळी येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्रमांक एम एच—४०/बी एफ—४३११ चा चालक आरोपी नामे— दिपक केसरी माटे, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०७, मातामाय बिछुवा यास स्टाफने थांबवून पाहणी केली असता त्याचेकडे ट्रकमध्ये ०८ ब्रास रेती आढळुन आल्याने वाहन चालक याला रेतीचे परवानाबाबत विचारले असता परवाना नसल्याचे सांगितले. आरोपीच्या ताब्यातून ट्रक क्रमांक एम एच—४०/बी एफ—४३११ किंमती ३०,००,०००/—रू व त्यामध्ये ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/—रू. असाए एकुण ३०,४०,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी चालक नामे— दिपक केसरी माटे, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०७, मातामाय बिछुवा** यांचे विरुद्ध पोलीस ठाणे भिवापुर येथे कलम ३०३(२), ४९, ३(५) भारतीय न्याय संहिता सहकलम ४८(७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, सहकलम ४, २१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**